# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ,
## पुणे विभागीय मंडळ ,पुणे 411005.

<u>महत्वाचे</u>

क्र :पुविमं/अ/उ.मा/प्रथम यादी/
पुणे४११००५
दिनांक :- 07/11/2016

प्रति,

प्राचार्य /मुख्याध्यापक,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये
(जिल्हा पुणे ,अहमदनगर,सोलापूर )

<u>विषय</u> :- फेब्रुवारी/मार्च-2017 मध्ये संपन्न होणा-या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणा-या नियमित, पुनर्परिक्षार्थी,खाजगी,श्रेणी सुधार व तुरळक विषय घेवून परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांच्या Online Prelist बाबत.

प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षी प्रिलिस्ट प्रिंट करून दिली जाणार नाही.प्रिलिस्ट मधील दुरूस्त्या ऑनलाईन पद्धतीने खालील प्रमाणे करण्यात याव्यात.

संबंधित विद्यार्थ्यांच्या नावातील अक्षरांच्या दुरूस्त्या जनरल रजिस्टर नुसार करण्यात याव्यात.

१ . विद्यार्थ्यांनी घेतलेले विषय व त्यांचे सांकेतिक क्रमांक माध्यमाचा कोड क्रमांक आणि परीक्षा केंद्र क्रमांक याचीही खात्री करावी . सदर पडताळणी काळजीपूर्वक न केल्याने मंडळास अडचणी येतात. ऐन परीक्षा काळात विद्यार्थ्यांना पुरवावयाच्या ठराविक माध्यमाच्या प्रश्नपत्रिकांचा मोठा प्रश्न उभा राहतो.व विद्यार्थ्यास वेळेवर प्रश्नपत्रिका मिळण्यास विलंब होतो. विद्यार्थ्यांची/पालकांची व मंडळाची धावपळ होते. दुरूस्त्यांच्या प्रस्तावांची संख्या वाढते त्यामुळे मंडळाची जनमानसात विश्वासार्हता कमी होते. आपल्या दुर्लक्षामुळे मंडळाला अनावश्यक जनक्षोभास सामोरे जावे लागते. ही बाब अत्यंत गंभीर आहे. तेव्हा या बाबींचा वरीलप्रमाणे केलेला उल्लेख विशेषत्वाने आपण स्वतः तपासून घेण्यात यावा.

२.प्रथम यादी (Prelist) मध्ये विद्यार्थ्याच्या आईचे नाव (Mothers Name) नसल्यास विद्यार्थ्यांकडून आईचे नाव घेऊन Prelist मध्ये योग्य जागी दर्शविण्यात यावे..

३. विषय योजनेची दुरूस्ती प्रथम याद्यी (Prelist) मध्ये कळविण्यात आले नसल्यास विद्यार्थ्यांच्या निकालावर परिणाम/शैक्षणिक नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कनिष्ठ महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

४.पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांची विषय सुट योग्य प्रमाणित दर्शविण्यात यावी.जेणेकरुन मंडळास निकालानंतर गुणपत्रक बदलुन द्यावे लागणार नाही याची दक्षता घ्यावी.

<u>वरील दुरुस्त्याबाबत आपल्याकडून काही त्रुटी राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.</u>
<u>Pre-list संदर्भातील सोबत जोडलेल्या नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करावे.</u>

७/११/२०१६
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे 411005.

प्रत माहितीसाठी
1.सचिव,राज्यमंडळ, पुणे 5
2.शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग
3.शिक्षणाधिकारी ,पुणे जिल्हा परिषद पुणे ,अहमदनगर,सोलापूर.

## - प्रमाणपत्र -

मी श्री./श्रीमती ------------------------------ प्राचार्य/प्राचार्या (जे-------)
कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव ------------------------------------------------प्रमाणित करतो/करते की, फेब्रुवारी/मार्च 2017 च्या उच्च माध्यमिक परीक्षेच्या प्रथम यादी (Prelist) मधील खालील बाबींची तपासणी मी व माझ्या सहका-यांनी केली आहे.

(1) उमेदवाराचे नाव व त्यांचे स्पेलिंग (मराठी व इंग्रजी) अक्षरानुसार/जनरल रजिस्टरमधील नोंदीनुसार तपासले आहे.

(2) उमेदवाराने घेतलेले विषय व त्यांचे सांकेतिक क्रमांक, माध्यम व माध्यमाचे सांकेतिक क्रमांक बरोबर आहे याची खात्री केली आहे.

(3) परीक्षा केंद्र क्रमांक बरोबर असल्याची खात्री केली आहे.

(4) उमेदवाराचा आवेदनपत्रावर चिकटविल्यानुसार फोटो बरोबर असल्याची खात्री केली आहे. त्याचप्रमाणे आपल्या वरील पत्रात नमूद केलेल्या अन्य बाबींची खात्री करण्यात आली आहे. अशाप्रकारे आपल्याकडून प्राप्त झालेली फेब्रुवारी/मार्च-2017 च्या परीक्षेची Pre-list वरीलप्रमाणे तपासणी करुन ऑनलाईन सादर करीत आहे. त्यानंतर त्यामध्ये काही त्रुटी राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर राहील.

(5) पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांची विषय सुट योग्य पद्धतीने दर्शविण्यात आली आहे.

(प्राचार्य)
सही शिक्का व संपूर्ण नाव

prelist_ist_list09